सिंधुदूर्ग (चिपी)-नवी मुंबई- सिंधुदूर्ग (चिपी)हवाई प्रवासाकरिता १०० % Viability Gap Funding करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग,

शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण२०२५/२९४/प्र.क्र.११८/विमान -२

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,मंत्रालय,

मुंबई-४०००३२.

दि. १६ नोव्हेंबर, २०२६

वाचा: १. अधिसूचना सामान्य प्रशासन विभाग क्र.मविवि-१२१५/प्र.क्र.१५७ (भाग-२)/२८-अ, दि.१८.०४.२०१७.

२. अधिसूचना सामान्य प्रशासन विभाग क्र.मविवि-१२१५/प्र.क्र.१५७ (भाग-२)/२८-अ, दि.२१.०६.२०१८

३. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण २०२५/२९४/प्र.क्र.११८/विमान-२, दि.३० मार्च, २०२६

४. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे पत्र क्र.MADC/RCS/Navi Mumbai-Shindhudurg-१००% VGF/१०५३, Dated १२.०९.२०२६, दि.१७.०९. २०२६ व दि.०५.१०.२०२६.

५. मा. मंत्रिमंडळ बैठकीचे इतिवृत्त दि.०४.११. २०२६.

प्रस्तावना:-

विमानप्रवास सामान्य नागरिकांना परवडेल या दृष्टीने एप्रिल २०१६ मध्ये केंद्र शासनाने Regional Connectivity Scheme (RCS) योजना जाहीर केली. या अनुषंगाने राज्यशासनाने RCS ची अंमलबजावणी करणेसंदर्भात भारत सरकार, महाराष्ट्र शासन व भारतीय विमानपत्तन प्राधिकरण (AAI) यांच्या मध्ये दिनांक २३ ऑगस्ट, २०१६ रोजी त्रिस्तरीय सामंजस्य करार केला आहे. सदर योजनेअंतर्गत अमरावती, गोंदीया, नाशिक, जळगाव, नांदेड, सोलापूर, कोल्हापूर, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या विमानतळांचा समावेश आहे. सदर योजनेअंतर्गत विमानतळ परिचालक (Airport Operator) यांना काही सवलती देण्यात येत असून याबाबतची अधिसूचना दिनांक १८ एप्रिल, २०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. केंद्र शासनाने Regional Connectivity Scheme RCS योजनेंतर्गत महाराष्ट्र राज्यामध्ये निश्चित केलेल्या हवाई मार्गासाठी केंद्र शासनाकडून ८० % व राज्य शासनाकडून २० % Viability Gap Funding (VGF) देण्यात येतो. राज्य शासनाच्या वाटयाची २० % Viability Gap Fund (VGF) ची प्रतिपूर्ती केंद्र शासनास करण्यात येते.

२. तथापि केंद्र शासनाच्या Regional Connectivity Scheme (RCS) योजनेंअतर्गंत सन २०२३ मध्ये विहीत केलेल्या मार्गदर्शक तत्वापैकी २.१.२.३ (f) द्वारे "Provision of a २०% share towards VGF for respective RCS Routes pertaining to the State, provided the share of States in the North-Eastern region of India and Union Territories would be १०%. Similarly, provision of १००% share towards VGF for respective State RCS Routes as proposed by the State Government and awarded under the Scheme" अशी तरतूद करण्यात आली आहे. उक्त तरतूदीनुसार चिपी विमानतळावरून चिपी-मुंबई-चिपी विमानसेवा सुरू करण्यास **M/s Just Udo Aviation Pvt. Ltd (Fly** ९१) कंपनीला दि.३० मार्च, २०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली होती. परंतु, **M/s Just Udo Aviation Pvt. Ltd (Fly** ९१) कंपनीला चिपी-मुंबई-चिपी हवाईसेवा सुरू करण्यासाठी मुंबई विमानतळावर स्लॉट उपलब्ध झाला नसल्यामुळे महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने मुंबई विमानतळाऐवजी चिपी विमानतळावरून सिंधुदुर्ग (चिपी) -नवी मुंबई व नवी मुंबई- सिंधुदुर्ग (चिपी) या दोन्ही मार्गांसाठी **M/s Just Udo Aviation Pvt. Ltd (Fly** ९१) कंपनीला प्रति आरसीएस आसनाकरीता रु.६,२००/-या दराने १००% **Viability Gap Funding (VGF)** करण्यास एका वर्षासाठी **रू.**१६,७४,६२,०००/- इतक्या खर्चास शासन मान्यता देणेबाबत महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्ताव दि.२७ ऑक्टोबर, २०२६ रोजी मा.मंत्रिमंडळ बैठकीत मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. मा. मंत्रिमंडळ बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

<u>शासन निर्णय :-</u>

सिंधुदूर्ग (चिपी) विमानतळावरून सिंधुदूर्ग (चिपी) -मुंबई- सिंधुदूर्ग (चिपी) विमानसेवा सुरू करण्यास दि.३० मार्च, २०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिलेली मान्यता रद्द करण्यात येत आहे.

२) केंद्र शासनाच्या Regional Connectivity Scheme (RCS) योजनेंअतर्गंत सन २०२३ मध्ये विहीत केलेल्या मार्गदर्शक तत्वास अनुसरून चिपी विमानतळावरुन सिंधुदूर्ग (चिपी) - नवी मुंबई व नवी मुंबई- सिंधुदूर्ग (चिपी) या हवाई मार्गासाठी राज्य शासनाकडून UDAN (RCS) च्या धर्तीवर एक वर्षासाठी किंवा चिपी (सिंधुदूर्ग) विमानतळावरुन सिंधुदूर्ग (चिपी) -नवी मुंबई व नवी मुंबई- सिंधुदूर्ग (चिपी) हवाई मार्ग केंद्र शासनाकडून RCS योजनेंतर्गत सुरु होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीसाठी M/s Just Udo Aviation Pvt. Ltd (Fly ९१) या कंपनीस सिंधुदूर्ग (चिपी) -नवी मुंबई व नवी मुंबई- सिंधुदूर्ग (चिपी) या हवाई मार्गासाठी प्रति आरसीएस आसनाकरीता रु.६,२००/- या दराने १००% Viability Gap Funding (VGF) करण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

३) Regional Connectivity Scheme (RCS) अंतर्गत सिंधुदूर्ग (चिपी) - नवी मुंबई व नवी मुंबई- सिंधुदूर्ग (चिपी) या दोन्ही मार्गासाठी १००% Viability Gap Funding (VGF) करण्यासाठी एक वर्षाकरीता रु.१६,७४,६२,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

४) प्रस्तुत हवाई मार्गाचा कालावधी चिपी विमानतळावरून सिंधुदूर्ग (चिपी) - नवी मुंबई व नवी मुंबई- सिंधुदूर्ग (चिपी) प्रत्यक्ष विमानसेवा सुरू होईल त्या तारखेपासून एक वर्षाचा राहील. त्यास मुदतवाढ दिली जाणार नाही.

५) सिंधुदूर्ग (चिपी) -नवी मुंबई व नवी मुंबई- सिंधुदूर्ग (चिपी) हवाई मार्ग केंद्र शासनाच्या Regional Connectivity Scheme (RCS) मध्ये समाविष्ट करण्याबाबत महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने पाठपुरावा करावा.

६) महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने सिंधुदूर्ग (चिपी) -नवी मुंबई व नवी मुंबई- सिंधुदूर्ग (चिपी) या दोन्ही मार्गासाठी VGF रक्कम अदा करतांना प्रत्यक्ष वारंवारिता लक्षात घेऊन त्याची प्रत्यक्ष गणना करून रक्कम अदा करण्याबाबत VGF देयके शासनास सादर करावे.

७) RFP मध्ये वाटाघाटीची तरतूद नसली तरी, M/s Just Udo Aviation Pvt. Ltd (Fly ९१) कंपनीबरोबर चर्चा करून काही प्रमाणात का होईना दर कपात करण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने करावी.

८) सदर खर्च "मागणी क्रमांक ए-७, ३०५३ नागरी विमानचालन, ०२ विमानतळ, १९० सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणूका, (००) (०२) विमानतळाच्या विकासाकरिता महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस सहायक अनुदान (कार्यक्रम) (३०५३ ०१६४)" या लेखाशिर्षाखाली करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

९) सदर शासन निर्णय मा. मंत्रिमंडळाने दि. २७ ऑक्टोबर, २०२६ रोजीच्या बैठकीमध्ये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१०) सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२६१११६१५०६०४०९०७ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षाकीत करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by SARIKA ASHISH GANVIR
Date: 2026.11.16 15:15:56 +05'30'

(सारिका मेंढे - गणवीर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति-

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, महाराष्ट्र राज्य ,मुंबई

२. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
३. मा.सचिव, नागर विमानन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.
४. मा.अध्यक्ष, भारतीय विमानपत्तन प्राधिकरण, नवी दिल्ली
५. मा.महासंचालक, नागरी विमानन संचालनालय, भारत सरकार, नवी दिल्ली
६. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
७. मा.उपमुख्यमंत्री(नगर विकास व इतर) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८. मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क व इतर) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
९. अपर मुख्य सचिव, (विमानचालन) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, वित्त व नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. प्रधान सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
१३. सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१४. विभागीय कार्यकारी संचालक, पश्चिम क्षेत्र भारतीय विमानपत्तन प्राधिकरण, मुंबई
१५. संचालक, विमानचालन संचालनालय, हँगर क्र.६, जुहू विमानतळ, विले पार्ले, मुंबई
१६. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी, मुंबई
१७. विभागीय आयुक्त, कोकण विभाग
१८. जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग, जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग.
१९. विमानतळ संचालक, IRB Sindhudurg Airport Pvt Ltd.
२०.निवडनस्ती.